0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१३/जा.२६८, दिनांक २६/०३/२०१३.

३) मे. जनता स्टोअर्सचे मालक कांतीलाल मेघजी गडा यांचे दिनांक ०९/०४/२०१३ रोजी प्राप्त लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१३/जा. ३८६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २५ /०४ /२०१३.

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १६/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. जनता स्टोअर्स, देवराम पानजी चाळ, क्वे स्ट्रिट, बी.पी.टी., प्लॉट नं. ३०२, शॉप नं. ५, दारुखाना, रे रोड, मुंबई - १० या पत्त्यावरील अन्नधान्यच्या व्यवसायाकरिता देण्यात आलेल्या किरकोळ परवाना क्र. ३ अ ८ (१४०९४) ची संपूर्ण तपासणी करण्यासाठी उक्त ठिकाणी उपस्थित झाले.

तद्नंतर अधिकारी वर्गांनी विहित नमुन्यात परवाना तपासणीकरिता पंचांसमक्ष सुरुवात केली असता, तपासणीमध्ये पुढीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या. १) भावफलक/साठाफलक लावलेला आढळला नाही. २) परवान्यावरील पत्ता व भाडेपावती विद्यूत देयकावरील पत्यामध्ये तफावत आढळली. ३) साठेपुस्तकातील आवक व त्याची देयके यांचा ताळमेळ जूळत नाही.

0002कागदपत्रांची व आवश्यक दस्तऐवजांची तपासणी केल्यानंतर अधिकाऱ्यांनी दुकानात प्रत्यक्ष शिल्लक असलेला अन्नधान्य साठ्याची पंचासमक्ष व परवानाधारक यांच्या समक्ष व त्यांच्या समवेत मोजदाद केली असता, दुकानात शिल्लक असलेला अन्नधान्य व कडधान्याचा खालीलप्रमाणे साठा आढळून आला.

| अ.क्र. | तपशिल | साठा (क्विंटल) |
|---|---|---|
| १ | दुकानाच्या शटरच्या पुढे असलेल्या काउंटर बॉक्समध्ये आढळून आलेला तांदळाचा साठा | २१ क्विंटल |
| २ | दुकानाच्या काऊंटरच्या मागे पोत्यांची थप्पी रचून साठवून ठेवलेला तांदळाचा साठा | १९८ क्विंटल |
| ३ | दुकानाच्या लाकडी पोटमाळ्यावर पोत्यांची थप्पी रचून साठवून ठेवलेला तांदळाचा साठा | २४ क्विंटल |
| ४ | दुकानाच्या लाकडी पोटमाळ्यावर पोत्यांची थप्पी रचून साठवून ठेवलेला कडधान्यांचा साठा | २४ क्विंटल |
| किरकोळ अन्नधान्य परवाना क्र. ३ अ ८ च्या व्यवसायाच्या पत्त्यावर आढळून आलेला अन्नधान्य/कडधान्याचा एकूण साठा | | २६७ क्विंटल |

किरकोळ अन्नधान्य परवाना क्र. ३ अ ८ च्या व्यवसायाच्या जागी त्यांना विहित केलेल्या मर्यादेपेक्षा ४३ क्विंटल तांदूळाचा अतिरिक्त साठा आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी अतिरिक्त आढळून आलेला तांदूळाचा ४३ क्विंटल रुपये १,०७,५००/- किंमतीचा साठा जागीच जप्त करुन रितसर सुपूर्दनाम्याद्वारे परवानाधारक कांतीलाल मेघजी गडा यांना सुपूर्द केला व पुढील आदेशापर्यंत सदर साठा सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असेल अशी सक्त ताकीद दिली आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०९/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. जनता स्टोअर्सचे तथा परवाना क्र. ३/अ/८ चे मालक कांतीलाल मेघजी गडा यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

0003

## युक्तिवाद :-

दिनांक ०९/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. जनता स्टोअर्सचे तथा परवाना क्र. ३/अ/८ चे मालक कांतीलाल मेघजी गडा यांनी युक्तीवाद केला की, त्याच्याकडे अन्नधान्य व्यवसायाकरिता देण्यात आलेला किरकोळ परवाना क्र. ३ अ-८ (१४०९४) आहे. दिनांक १६/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांनी त्याच्या दुकानात भेट देऊन दुकानाची तपासणी केली. तपासणी वेळी भावफलक/साठाफलक लावलेला नसल्याचे आढळले, दुकानाची सकाळी साफ-सफाई करत असताना भावफलक/साठाफलक साफ करण्यासाठी नोकरांनी दुकानाच्या मागील बाजूस ठेवला होता. तो नजर चुकीने पुन्हा जागेवर लावण्याचा राहून गेला. परवानावरील पत्ता भाडे पावती व विद्युत बिलावरील तफावत भाडे पावती वर पत्ता बरोबर आहे. परंतू विद्युत बिलावरील पत्त्यात व किरकोळ परवानाच्या पत्त्यात साधारण फरक आहे. ते लवकरच सुधारुन घेऊ. साठापुस्तकावरील आवक व देयक यांचा ताळमेळ जुळत नाही, याबाबत खुलासा सादर करतो की, त्यांच्या मुलांचा १ वर्षापूर्वी बिचकॅन्डी रुग्णालयात पायाचे तीन ऑपरेशन झाले आहे. ऑपरेशन करणारे डॉ. श्री. सि. जे. ठक्कर यांचे क्लिनीक लेक साईड, बांद्रा येथे असून तिथे त्याच्या मुलाला दररोज कसरत, मालिश व इतर उपचारासाठी घेऊन जावे लागत असे, या कारणे दुकानाचा व्यवहार, कामकाज नोकर सांभाळत असून तो कधी-कधीच दुकानात येऊन जात असे, या कारणास्तव साठापुस्तकातील नोंदी व देयके यांचा ताळमेळ जुळत नसल्याचे निदर्शनास येते. दुकानात असलेला अन्नधान्याचा साठा अधिकाऱ्यांनी तपासला असता, सदर साठ्यात तांदुळाचा साठा ४३ क्विंटल जास्त आढळला. याबाबत खुलासा करतो की, किरकोळ विक्रेता परवानामध्ये तांदुळाचा साठा ठेवण्याची मर्यादाची त्याला जाणीव नव्हती व त्याच्या मुलाच्या उपचाराच्या धावपळीमुळे दुकानाचा कारोभार नोकरच सांभाळत असे. नोकरांनी वेळोवेळी नोंद घेतली नाही, त्याकारणी दुकानात ४३ क्विंटल तांदुळाचा साठा मर्यादेपेक्षा जास्त आढळला. सदर नमूद केलेले दोष हे उपरोक्त परिस्थितीमुळे अनावधाने झाले असून अशाप्रकारची चुक पुन्हा त्याच्याकडून होणार नाही, याबाबत तो जातीने लक्ष देईन, तरी वरील दोषाबाबत त्याला सहानभुती दर्शवून क्षमा करावी अशी क्षमा याचना करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.



& DIRECTOR OF ... OFFICE ... MBAI

0004 प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १६/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचासह मे. जनता स्टोअर्स, देवराम पानजी चाळ, क्वे स्ट्रिट, बी.पी.टी., प्लॉट नं. ३०२, शॉप नं. ५, दारुखाना, रे रोड, मुंबई - १० या पत्त्यावरील अन्नधान्याच्या व्यवसायाकरिता देण्यात आलेल्या किरकोळ परवाना क्र. ३ अ ८ (१४०९४) ची संपूर्ण तपासणीच्या अनुषंगाने, किरकोळ अन्नधान्य परवाना क्र. ३ अ ८ च्या व्यवसायाच्या जागी त्यांना विहित केलेल्या मर्यादेपेक्षा ४३ क्विंटल तांदूळाचा अतिरिक्त साठा आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी अतिरिक्त आढळून आलेला तांदूळाचा ४३ क्विंटल रुपये १,०७,५००/- किंमतीचा साठा जागीच जप्त करुन रितसर सुपूर्दनाम्याद्वारे परवानाधारक कांतीलाल मेघजी गडा यांना सुपूर्द केला व पुढील आदेशापर्यंत सदर साठा सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असेल अशी सक्त ताकीद दिली आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध होते व तदनंतर अधिसुचना क्र एस.ओ.२९६८ (ई), दिनांक २० डिसेंबर, २०१२ अन्वये दिनांक ३०/११/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

प्रस्तूत प्रकरणी, जप्त साठ्याचे मालक कांतीलाल मेघजी गडा यांचेकडे देवराम बेनजी चाळ, क्वे स्ट्रीट, बीपीटी नं. ३, रे रोड, मुंबई या त्यांच्या व्यवसायिक पत्त्यावर दिनांक ३१/१२/२०१४ पर्यंत विधिग्राह्य असलेला दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ अन्वये परवाना क्र. ३-अ-८ हा किरकोळ परवाना तांदूळ व साखर या अनुसुचित वस्तुंच्या किरकोळ व्यापारासाठी असल्याचे दिसून येते. उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांच्या अधिपत्याखालील पथकाने दिनांक १६/०२/२०१३ रोजी परवानाधारकाची आकस्मिक तपासणी केली असता, तपासणीचेवेळी तांदळाचा २४३ क्विंटल साठा, कडधान्याचा २४.२५ क्विंटल साठा, खाद्यतेलाचा २७.४७ क्विंटल साठा तसेच साखरेचा ४.५० क्विंटल साठा शिल्लक असल्याचे पथकास आढळुन आले.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ या आदेशान्वये अन्नधान्य, डाळी/कडधान्य, खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंचे किरकोळ व्यापारी हे विविध प्रकारचे अन्नधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात १०० क्विंटल व त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास तसेच विविध प्रकारच्या डाळी/कडधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास त्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये पारित केलेल्या साठा मर्यादेच्या विवरणपत्र-३ मधील नमूद तपशिलानुसार महानगरपालिका क्षेत्रात तांदळासाठी विहीत कमाल मर्यादा २०० क्विंटल नमूद आहे. तथापी, साठवणूक केलेल्या साठ्यापैकी साखरेवरील निर्बंध काढुन टाकण्यात आल्याने साखरेच्या घाऊक अथवा किरकोळ व्यवसायाकरीता परवाना घेण्याची गरज नाही.

उपरोक्त बाबी विचारात घेता सदर किरकोळ परवानाधारकाकडे तपासणीचेवेळी आढळुन आलेल्या साठ्यापैकी कडधान्याचा साठा हा ५० क्विंटलपेक्षा कमी असल्याने तसेच साखरेवरील निर्बंध शिथील केल्याने त्यांना डाळी/कडधान्य व साखरेच्या व्यापारासाठी किरकोळ परवाना घेण्याची गरज नाही. तथापी, सदर परवानाधारकाने तांदूळ या अनुसुचित वस्तूचा साठवणूक केलेल्या एकूण २४३ क्विंटल साठ्यापैकी ४३ क्विंटल तांदळाचा साठा हा त्यांनी किरकोळ परवानाधारकास अनुज्ञेय असलेल्या विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरिक्त साठवणूक केल्याचे आढळुन आले आहे. सदर तपासणीचेवेळी भावफलक/साठाफलक लावलेला नसल्याचे, परवान्यामधील नमूद पत्ता व कागदोपत्री असलेला पत्ता यामध्ये तफावत आढळुन आल्याचे, साठापुस्तकातील नमूद साठा व प्रत्यक्षात शिल्लक असलेला साठा यामध्ये तफावत आढळुन आल्याचे तसेच ४३ क्विंटल तांदळाचा साठा हा अतिरिक्त साठवणूक केल्याने सदर परवानाधारकाने महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ या आदेशाचे कलम १०, ११ व १२ तसेच सदर आदेशान्वये देण्यात आलेल्या परवान्यामधील अट क्र. ३, ५, ७, ८ व १३ चे तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केल्याचे सिद्ध होत असल्याने कांतीलाल मेघजी गडा या किरकोळ परवानाधारकाचा अतिरिक्त आढळुन आलेला ४३ क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) मे. जनता स्टोअर्स यांचा जप्त करण्यात आलेला ४३ क्विंटल तांदळाचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उक्त शासनजमा करण्यात आलेला तांदळाचा साठा हा उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वैधपरवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालांची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यांत "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. जनता स्टोअर्सचे मालक कांतीलाल मेघजी गडा
(उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, अ परिमंडळ, परेल यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE - 378 - MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

D:\user E\Amaldata-2013\Amimal Aadesh\Aadesh.doc